**SET-4**

**Series GBM**

**कोड नं.**
**Code No. 9**

रोल नं.
Roll No. | | | | | | | |

परीक्षार्थी कोड को उत्तर-पुस्तिका के मुख-पृष्ठ पर अवश्य लिखें ।

Candidates must write the Code on the title page of the answer-book.

- कृपया जाँच कर लें कि इस प्रश्न-पत्र में मुद्रित पृष्ठ **5** हैं ।
- प्रश्न-पत्र में दाहिने हाथ की ओर दिए गए कोड नम्बर को छात्र उत्तर-पुस्तिका के मुख-पृष्ठ पर लिखें ।
- कृपया जाँच कर लें कि इस प्रश्न-पत्र में **8** प्रश्न हैं ।
- **कृपया प्रश्न का उत्तर लिखना शुरू करने से पहले, प्रश्न का क्रमांक अवश्य लिखें ।**
- इस प्रश्न-पत्र को पढ़ने के लिए 15 मिनट का समय दिया गया है । प्रश्न-पत्र का वितरण पूर्वाह्न में 10.15 बजे किया जाएगा । 10.15 बजे से 10.30 बजे तक छात्र केवल प्रश्न-पत्र को पढ़ेंगे और इस अवधि के दौरान वे उत्तर-पुस्तिका पर कोई उत्तर नहीं लिखेंगे ।
- Please check that this question paper contains **5** printed pages.
- Code number given on the right hand side of the question paper should be written on the title page of the answer-book by the candidate.
- Please check that this question paper contains **8** questions.
- **Please write down the Serial Number of the question before attempting it.**
- 15 minute time has been allotted to read this question paper. The question paper will be distributed at 10.15 a.m. From 10.15 a.m. to 10.30 a.m., the students will read the question paper only and will not write any answer on the answer-book during this period.

# मराठी

# MARATHI

*वेळ : 3 तास* | *गुण : 100*

*निर्धारित समय : 3 घण्टे* | *अधिकतम अंक : 100*

*Time allowed : 3 hours* | *Maximum Marks : 100*

## SECTION A (Comprehension)

**1.** खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे लिहा :

अंत्यज अर्थात अस्पृश्यांचा वर्ग तेराव्या शतकात गरिबी, लाचारी, दैन्य, उपेक्षा व गुलामीचे जीवन जगत होता. महारांना पडेल ते काम करावे लागे व त्या मोबदल्यात उष्टे अन्न खावे लागे, याबद्दलचा उद्वेग कर्ममेळा व्यक्त करतो. स्मशानव्यवस्था व स्मशानांची देखरेख हेही अंत्यजांचे काम होते. त्या मोबदल्यात मृतांच्या टाकून दिलेल्या वस्त्रांवर अंत्यजांना अधिकार सांगता येई.

सार्वजनिक कामासाठी राजाचे अधिकारी अस्पृश्यांना सक्तीने वेठबिगार म्हणून कामास जुंपत असावेत. त्यांतील एखादा मृत्युमुखी पडला तरी त्याची फिकीर केली जात नसावी, असे चोखामेळा यांच्या उदाहरणावरून दिसते.

अस्पृश्यांना वेसकर म्हणून वेस राखण्याचे, तसेच तराळ म्हणून रात्रीची गस्त घालण्याचे, येणाऱ्या-जाणाऱ्यांची विचारपूस करण्याचे काम करावे लागे. तराळाला वेळप्रसंगी चोरीचा शोध घेण्याचे काम करावे लागे.

त्या काळात बहुसंख्य लोकांचा व्यवसाय हा शेती व पशुपालन होता. बहुसंख्य कुणबी स्वतः शेती कसत. कुळवाडी हे शेतीचे वाटेकरी असत. मोलकरी म्हणजे मोलाने माणसे घेऊन शेती करण्याचे उल्लेखही आढळतात.

त्या काळात ऊस आणि द्राक्षाचे पीक घेतले जात होते. गुऱ्हाळ चालवले जात असावे. गूळ व साखरेचे संदर्भ हे याचे पुरावे आहेत. जलाशयातील पाणी शेतीला नेण्यासाठी ‘घटिकायंत्र’ म्हणजे रहाटगाडग्यांचा उपयोग केला जात असे. तसेच काही ठिकाणी मोटेचा वापरही केला जात असे.

**प्रश्न :**

(i) कर्ममेळयाने कशाविषयी उद्वेग व्यक्त केला आहे ? *2*

(ii) सार्वजनिक कामासाठी राजाचे अधिकारी कोणती दंडेली करत ? *2*

(iii) तराळाचे काम काय होते ? *2*

(iv) शेतीची कष्टाची कामे कोण करीत असे ? *2*

(v) शेतीच्या पाण्याची व्यवस्था कशाप्रकारे केली जात असे ? *2*

## SECTION B (Writing)

**2.** खालीलपैकी ***एका*** विषयावर 25 ते 30 ओळींत निबंध लिहा : *15*

(i) जय जवान जय किसान !

(ii) महिला खेळाडूंची नेत्रदीपक कर्तबगारी

(iii) सार्वजनिक उत्सव बंद झाले तर ...

## SECTION C (Grammar)

**3.** खालीलपैकी कोणत्याही ***पाच*** विधानांमध्ये कंसातील सूचनेप्रमाणे बदल करा : *15*

(i) मी लगेच त्याला फोन केला. (कर्तरी करा)

(ii) धुतलेले कपडे गच्चीत वाळत टाकले. (आज्ञार्थी करा)

(iii) हिरवीगार वनश्री पाहून तिचे मन थुई थुई नाचू लागले.
(वाक्प्रचाराऐवजी त्याच्या अर्थाचे उपयोजन करून वाक्य पुन्हा लिहा)

(iv) तो समोरून येणारी रिक्षा थांबवतो. (कर्मणी करा)

(v) सर्वजण पाणी अगदी काटकसरीने वापरतात. (विध्यर्थ करा)

(vi) मोठ्या शिताफीने पोलिसांनी चोर पकडला. (भावे प्रयोग करा)

(vii) अरेरे ! (बिचारी) हिरमोड झाला !

**4.** (अ) वचन बदला : *2*

(i) जाळे

(ii) वाघ

(ब) क्रियाविशेषण बनवा : *3*

(i) दुःख

(ii) रात्र

(iii) बाजू

**5.** कंसातील शब्दांची योग्य रूपे वापरून वाक्य पूर्ण लिहा. (कोणतेही ***पाच***) *5*

(i) ती फारच (चिडणे) तडातड बोलत होती.

(ii) अनुपम (सकाळ) उठून फिरायला गेला.

(iii) तिने पेरू कापून त्याच्या फोडी (ताटली) मांडून ठेवल्या.

(iv) कुणीतरी गाडी आडवी (घालणे) वाहतुकीची कोंडी झाली.

(v) वादळाने कित्येक झाडे (मुळे) उपटून पडली.

(vi) तिने करकचून (गाडी) ब्रेक दाबले आणि गाडी थांबवली.

(vii) हाय हाय ! कोण हा (दुःख) प्रसंग ।

## SECTION D (Literature)

**6.** (अ) पुढीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची संक्षिप्त उत्तरे लिहा : *5×2=10*

(i) गुंडगुळयाच्या माळावरून जाताना तुकारामाच्या मनात कोणकोणते विचार येत होते ?

(ii) परीक्षेत वीज जाण्याची शक्यता असल्यामुळे मानसीकडून कोणते सराव करून घेण्यात आले ?

(iii) लेखकाचे नंदनवन कोठे व कसे आहे ?

(ब) पुढीलपैकी कोणत्याही ***दोन*** अवतरणांचे संदर्भासह स्पष्टीकरण करा : *5×2=10*

(i) "विकसित देशांमध्ये जे आज सर्व काही 'सुजलाम् सुफलाम्' दिसतंय तो काही चमत्कार नाही."

(ii) " 'ज्याची खावी पोळी, व्याची वाजवावी टाळी' या वृत्तीनं वागणारी माणसं श्रीमंतांच्या पदरी कायम असतात. अशा होयबाशिवाय या श्रीमंतांचं पानदेखील हलत नाही."

(iii) "माझी धाव दोनचार फुलझाडे अन् मागच्या बाजूस एक ट्रॅडिशनल तुळशीवृंदावन यापलीकडे गेलीच नसती."

**7.** (अ) पुढीलपैकी कोणत्याही ***दोन*** अवतरणांचे संदर्भासह स्पष्टीकरण करा : *5×2=10*

(i) “सह्यगिरीतिल वनराजांनो या कुहरांतुनि आज पुढे
रक्त हवे जर स्वतंत्रतेला, रक्ताचे पडतील सडे !”

(ii) “बीय टरारे भुईत
सर्वे कोंब आले वऱ्हे
गह्यरलं शेत जसं / आंगावरती शहारे”

(iii) “बाईच्या ओठांआड दडलेले असते रडणे
वर वर हसणे आणि आतल्याआत कुढणे !”

(ब) खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** पद्यांशांतील अलंकार ओळखा : $2\frac{1}{2}\times2=5$

(i) “नळराजकथा सुधाचि साजे
दमयंती वरवर्णिनी विराजे
मिळणी उभयांसि होय जेथे
अधिकारी अधिकानुराग तेथे”

(ii) “वीर मराठे गर्जत आले
पर्वत सारे कंपित झाले”

(iii) “तुझ्यासारखी दुजी न कोणी, तू रूपाची खाणी गं !”

**8.** (अ) सामाजिक संपर्कासाठीच्या संकेतस्थानांचे फायदे सांगा. *10*

**किंवा**

आकाशवाणीसाठी भाषण लिहिताना कोणत्या गोष्टींचा विचार करावा लागतो ?

(ब) महानगरपालिकेच्या निवडणुकांच्या निकालाची बातमी तुम्ही दूरचित्रवाणीसाठी लिहिणार आहात. ही बातमी लिहिताना कोणती काळजी घ्याल ? *5*